# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मनपा ठराव क्र.19/वि.क्र.99,दि.20.01.2021 अन्वये प्रधानमंत्री आवास
**{समाज विकास विभाग}** योजना घटक क्र.3 (परवडणारी घरकुले) अंतर्गत निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थांना शासन अनुदान रु.2.5 लक्ष सह रु.50,000/- महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे.या योजनेंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3 (परवडणारी घरकुले) सह प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.4(**BLC**) व रमाई आवास योजना घटकातील दिव्यांग लाभार्थी किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास त्यांना या योजनेंतर्गत रु.2.5 लक्ष सह रु.50,000/- महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य देण्याचे योजनेत समावेश करण्याचे निर्देश मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिले आहे.

झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,नागपूर तसेच स्लम विभागाकडून प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.4(**BLC**) व रमाई घरकुल आवास योजनेबाबत सविस्तर निकष नस्तीत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदहू योजनेत बदल करण्याहेतु पुढीलप्रमाणे सुधारित निकष प्रस्तावित करण्यात येत आहे,

योजना -

(अ) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले) अंतर्गत नासूप, म्हाडा व मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या व बांधण्यात येत असलेल्या मनपा हद्दीतील बांधकामाकरिता सोडत पद्धतीने निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

(ब) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 4 (**BLC**) अंतर्गत घरकुलाचे बांधकाम करण्यास निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

(क) रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलाचे बांधकाम करण्यास निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

अर्थसहाय्य - रु.50,000/- (लाभार्थी - अर्जदार स्वत: दिव्यांग असल्यास किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास योजनेचा लाभ देण्यात येईल.

कार्यक्षेत्र -

नागपूर शहरातील प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले), घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत नासुप्र,म्हाडा व मनपा तर्फे मनपा हद्दीतील बांधकाम केलेली घरकुले.

अटी व शर्ती -

१) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घटक क्र. ३ खाजगी भागीदारीतून परवडणाऱ्या घरांची निर्मितीची योजना (**AHP**), प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजना अंतर्गत निवड झालेल्या यादीत अर्जदाराचे नाव असणे बंधनकारक राहील व त्याबाबतचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण/ स्लम विभाग यांच्या मार्फत शिफारस केलेल्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल.

२) सदर योजनेचा लाभ कुटुंबातील अर्जदार स्वत: दिव्यांग असल्यास किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास फक्त एकाच सदस्याला घेता येईल.( परिवार म्हणजे,रक्त नात्यातील सदस्य जसे- पती,पत्नी, मुले,आई,वडील,अविवाहित बहिण,भाऊ इ.)

३) लाभार्थी हा म्हाडा, **NIT, NMC** इत्यादी पंतप्रधान आवास योजनेची व रमाई घरकुल आवास योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा पात्र यादीतील असणे आवश्यक आहे.

४) कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याबाबत भाडे करारनामा/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)

५) आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.

६) अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
७) अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व **UDID** कार्ड जोडणे बंधनकारक राहील.त्याशिवाय योजनेचा लाभ देता येणार नाही.
८) सदर योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयातीत एकदाच लाभ मिळेल.
९) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले), घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे घरकुलाचे टप्पे निहाय बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्यानंतर रु. 50,000/- चे अनुदानाची रक्कम थेट **DBT** अंतर्गत लाभार्थ्यांचे बँक खात्यावर वळते करण्यात येईल.
१०) ज्या व्यक्तीने यापूर्वी कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतला असेल त्यांना सदर योजने अंतर्गत पात्र ठरणार नाही.
११) लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. १००/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.
१२) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार सुधारित अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्थसहाय्य योजना राबविण्याच्या प्रश्न विचारात घेवून योजनेस मान्यता प्रदान करण्याबाबत.

टिप - 1) सविस्तर माहिती नस्तीत संलग्न
2) योजनेंतर्गत खर्च दिव्यागांकरिता मदत या पदशीर्ष क्र. **A**27301342302 मधून करण्यात येईल.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 10/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 22/12/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा ठराव क्र.19/वि.क्र.99,दि.20.01.2021 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3 (परवडणारी घरकुले) अंतर्गत निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थांना शासन अनुदान रु.2.5 लक्ष सह रु.50,000/- महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे.या योजनेंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3 (परवडणारी घरकुले) सह प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.4(**BLC**) व रमाई आवास योजना घटकातील दिव्यांग लाभार्थी किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास त्यांना या योजनेंतर्गत रु.2.5 लक्ष सह रु.50,000/- महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य देण्याचे योजनेत समावेश करण्याचे निर्देश मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिले आहे.

झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,नागपूर तसेच स्लम विभागाकडून प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.4(**BLC**) व रमाई घरकुल आवास योजनेबाबत सविस्तर निकष नस्तीत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदहू योजनेत बदल करण्याहेतु पुढीलप्रमाणे सुधारित निकष प्रस्तावित करण्यात येत आहे,

योजना -

(अ) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले) अंतर्गत नासुप, म्हाडा व मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या व बांधण्यात येत असलेल्या मनपा हद्दीतील बांधकामाकरिता सोडत पद्धतीने निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

(ब) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 4 (**BLC**) अंतर्गत घरकुलाचे बांधकाम करण्यास निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

(क) रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलाचे बांधकाम करण्यास निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिके कडून अर्थसहाय्य योजना.

**अर्थसहाय्य** - रु.50,000/- (लाभार्थी - अर्जदार स्वत: दिव्यांग असल्यास किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास योजनेचा लाभ देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** -

नागपूर शहरातील प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले), घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत नासुप्र,म्हाडा व मनपा तर्फे मनपा हद्दीतील बांधकाम केलेली घरकुले.

अटी व शर्ती -

१) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घटक क्र. ३ खाजगी भागीदारीतून परवडणाऱ्या घरांची निर्मितीची योजना (**AHP**), प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजना अंतर्गत निवड झालेल्या यादीत अर्जदाराचे नाव असणे बंधनकारक राहील व त्याबाबतचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण/ स्लम विभाग यांच्या मार्फत शिफारस केलेल्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल.

२) सदर योजनेचा लाभ कुटुंबातील अर्जदार स्वत: दिव्यांग असल्यास किंवा अर्जदाराच्या परिवारातील दिव्यांग व्यक्ती सदस्य असल्यास फक्त एकाच सदस्याला घेता येईल.( परिवार म्हणजे,रक्त नात्यातील सदस्य जसे- पती,पत्नी, मुले,आई,वडील,अविवाहित बहिण,भाऊ इ.)

३) लाभार्थी हा म्हाडा, **NIT, NMC** इत्यादी पंतप्रधान आवास योजनेची व रमाई घरकुल आवास योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा पात्र यादीतील असणे आवश्यक आहे.

४) कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याबाबत भाडे करारनामा/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)

५) आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.

६) अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.

७) अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व **UDID** कार्ड जोडणे बंधनकारक राहील.त्याशिवाय योजनेचा लाभ देता येणार नाही.

८) सदर योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयातीत एकदाच लाभ मिळेल.

९) प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले), घटक क्र. 4 (**BLC**), रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे घरकुलाचे टप्पे निहाय बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्यानंतर रु. 50,000/- चे अनुदानाची रक्कम थेट **DBT** अंतर्गत लाभार्थ्यांचे बँक खात्यावर वळते करण्यात येईल.

१०) ज्या व्यक्तीने यापूर्वी कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतला असेल त्यांना सदर योजने अंतर्गत पात्र ठरणार नाही.

११) लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. १००/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

१२) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार सुधारित अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्थसहाय्य योजना राबविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.